

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018 BOOK VI
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT IN INDIA

27th January, 2018

2017-18



*Editor*
**Dr. Namanand G. Sathe**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Scanned with CamScanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)


| | | | |
|---|---|---|---|
| 41. | महाराष्ट्राच्या राजकारणातील स्त्रीयांची भूमिका | प्रा.डॉ.सुरेश भालेराव<br>प्रा. डॉ. सुनिल शिंदे | 119 |
| 42. | The Political Participation and Indian Women | Rajendra S. Korde | 122 |
| 43. | महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग | डॉ.अनंत मदन आवटी | 125 |
| 44. | पंचायतराज व्यवस्थेतील महिला आरक्षण : महिला सबलीकरणाचा एक प्रयास | डॉ.दयानंद माधवराव गुंडेवार | 128 |
| 45. | महिला सबलीकरण संकल्पना, उद्दिष्टे आणि समस्या | डॉ. वानखेडे उमाकांत | 131 |
| 46. | भारतीय स्त्रीवादी साहित्याची वाटचाल | डॉ. दीपक सूर्यवंशी | 136 |
| 47. | स्त्रीवाद | प्रा.सौ.कांबळे एस.एस. | 138 |
| 48. | Women Empowerment | Hangargekar Vithal | 141 |
| 49. | महिला सक्षमीकरण : भारतातील महिलांचा राजकीय सहभाग | प्रा.डॉ.डी.बी. ढोबळे | 143 |
| 50. | महिला सशक्तीकरणात पंचायत राजचे योगदान | डॉ. आर.एन. शेवाळे | 147 |
| 51. | Women's Empowerment In Politics And Representation | Dr.Farooqui Q. M. Y. | 149 |
| 52. | सामाजिक धोरण आणि महिला | डॉ.सिध्देश्वर सटाले | 154 |
| 53. | स्त्रीवाद : अर्थ, उद्दिष्टे आणि विकास | प्रा. डूणगव अशोक | 156 |
| 54. | Participation Of Women In Panchayatiraj ... | Nirmal Ekanath S. | 159 |
| 55. | Contribution of Woman in the Politics of Maharashtra | Dr Arjun Galphade | 165 |
| 56. | पंचायत राजमधील महिला नेतृत्व | प्रा. गौतम कांबळे | 164 |
| 57. | स्त्री वाद आणि स्त्री सबलीकरण – सद्यःस्थिती | प्रा.गुजर अनुराधा वसंत | 166 |
| 58. | स्त्रीवाद अर्थ स्वरूप, विकास व प्रकार | प्रा.सुधाकर श्रीरंग डोंगे | 168 |
| 59. | भारतातील महिला सक्षमीकरण | ज्योत्स्ना जी. गायकवाड | 170 |
| 60. | पर्यावरणवादी स्त्रीवाद | डॉ. बाबासाहेब पोकळे | 172 |
| 61. | महिला सबलीकरण : अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे | प्रा.डॉ. बळीराम कतारे | 174 |
| 62. | राजकीय सहभागातुन महिलांचे सबलीकरण | प्रा. सतिष कटके | 177 |
| 63. | महिलासक्षमीकरण आणि प्रशासनाची भूमिका | डॉ.लिहके केशव दत्तराव | 180 |
| 64. | महिला सबलीकरण भारतीय लोकशाही सक्षमीकरणाची पूर्वअट | प्रा.एकनाथ घरात | 182 |
| 65. | भारतातील महिला सबलीकरण | प्रा. विलासराव लवटे | 185 |
| 66. | स्त्रिवादाचा अर्थ, दृष्टीकोन व अभ्यासपध्दती | लोखंडे श्रीरंग शामराव | 188 |
| 67. | स्त्रीवाद : ऐतिहासिक पार्श्वभूमी, उगम व स्वरूप | प्रा.डॉ.एस.के.शिंदे,<br>प्रा.एम.बी. जोगदंड | 190 |
| 68. | Constitution Of India And Women Empowerment | Dr. V. M. Malure | 193 |
| 69. | मानवी हक्क आणि महिला | डॉ. मानवते उत्तम | 197 |
| 70. | पंचायतराज व्यवस्था महिलासबलीकरण : काल, आज आणि उद्या | प्रा. डॉ. अमोल काळे | 200 |
| 71. | महिला सबलीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | प्रा बबन आमले | 202 |
| 72. | महिला सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेले प्रयत्न. | प्रा.बदनाळे शिवरुद्र | 205 |
| 73. | स्त्रीवादी साहित्य संकल्पना व स्वरूप | डॉ.गव्हाणे भाऊसाहेब | 209 |
| 74. | महिलासक्षमीकरणात पंचायतराज व्यवस्थेची भूमिका | चव्हाण दिपक | 211 |
| 75. | महिला सबलीकरण संकल्पना व समस्या | डॉ. कल्पना कदम | 213 |
| 76. | महिला सबलीकरण काळाची गरज | डॉ.सुनिलपिंपळे | 215 |
| 77. | महिला सबलीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. ए. एन. सिरसेवाड | 217 |
| 78. | महिला सबलीकरण अर्थ स्वरुप उद्दिष्टये | डॉ. सूर्यकांत सांभाळकर | 220 |




Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# 52.

# सामाजिक धोरण आणि महिला

डॉ.सिध्देश्वर सटाले
राज्यशास्त्र विभागप्रमुख
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना**

प्रारंभीच्या काळात भारत सरकारने महिलांसाठी कल्याणकारी धोरण या पध्दतीचेच धोरण निश्चित केले. यामध्ये सरकारचा भर फायदे करण्यावर होता. याशिवाय शिक्षण, आरोग्य व कल्याण अशा सामाजिक सेवांच्या लाभार्थी म्हणून महिला धोरण समजले गेले. कल्याणकारी धोरणाची जागा १९७५ नंतर विकासलक्षी धारणांनी घेतली. हा बदल आरंभीच्या धोरणात झाला. यानंतर १९९० नंतर कल्याणकारी व विकासलक्षी हे दोन दृष्टिकोन मागे पडले आणि त्या जागी 'महिला सबलीकरण' हे नवे धोरण भारत सरकारने स्वीकारले. कॉंग्रेस व भाजप या दोन पक्षांचा महिला सबलीकरण धोरणावर जास्त प्रभाव राहिला. शिक्षण, आरोग्य, कायदा व न्याय, प्रशासकीय सेवांमध्ये नोकरीची संधी व राजकीय क्षेत्रात राखीव जागा हे महिला सबलीकरण धोरणाचे क्षेत्र ठरविले गेले.

## ❖ महिला सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरण :

भारतीय राज्यघटनेच्या सरनामा, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यामध्ये 'स्त्री-पुरुष समता' हे तत्व व्यक्त होते. राज्यघटना केवळ महिलांना समतेची शाश्वती देत नाही, तर राज्यसंस्थेने प्रसंगी किमान मोजुकी महिलांच्या सार्वजनिक हिताचा विचार केला पाहिजे, अशी भूमिका घेते. यासाठी राज्यसंस्थेला अधिकार राज्यघटना देते. लोकशाही व्यवस्थेच्या चौकटीमध्ये कायदे, विकासाची धोरणे, नियोजन आणि कार्यक्रम यामध्ये महिलांना केंद्रीभूत मानले गेले. पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून (१९७४-७८) महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. महिलांच्या कल्याणाबरोबरच त्यांच्या विकासाकडेसुध्दा लक्ष पुरविण्यात येऊ लागले. गेल्या काही वर्षांपासून केंद्रीय पातळीवरूनच महिला सबलीकरण हे धोरण ठरविले गेले. संसदेच्या कायद्यानुसार १९९० मध्ये राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यात आला. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनेच महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण दिले. यामुळे स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला. महिलांच्या समान अधिकारासंबंधीच्या वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय करारांना भारत सरकारने मंजुरी दिली आहे.

## ❖ राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरणाची ध्येये व उद्दिष्टे :

१. महिलांच्या संपूर्ण विकासासाठी सकारात्मक आर्थिक, सामाजिक धोरणांच्या माध्यमातून वातावरणनिर्मिती करणे.
२. राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नागरी क्षेत्रात महिलांना समान हक्क, स्वातंत्र्य दिले पाहिजे.
३. राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनामध्ये महिलांना सहभागी होण्याची व निर्णय घेण्याची समान संधी असेल.
४. सर्वच पातळ्यांवर दर्जेदार शिक्षण, करिअर व व्यावसायिक सल्ला, नोकरी, समान वेतन, व्यावसायिक सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, आरोग्याची देखभाल करण्याची समान संधी महिलांना असेल.
५. महिलांचे शोषण करणाऱ्या सर्व प्रथा-परंपरा नष्ट करणारी बळकट स्थानिक संस्था निर्माण करणे.
६. सामूहिक कृतीमध्ये महिला व पुरुष यांचा समान सहभाग वाढविणारा दृष्टिकोन विकसित करणे.
७. विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीवादी दृष्टिकोनाचा स्वीकार करणे.
८. नागरी समाजातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला संघटना स्थापना करण्यावर भर द्यावा.

## ❖ महिलांचे राजकीय सक्षमीकरण :

भारतीय संसदेने आरक्षण विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती २४ एप्रिल १९९३ ला अस्तित्वात आली. संपूर्ण भारतात त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था, शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार व स्वायत्तता आणि या सर्व संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमाती व स्त्रियांना आरक्षण या वैशिष्ट्यांसह घटनादुरुस्तीचा अंमल सुरू झाला. या घटनादुरुस्तीन्वये त्रिस्तरीय पंचायतीमध्ये व नगरपालिका, महानगरपालिका या संस्थांमध्ये स्त्रियांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. हे आरक्षण केवळ सर्वसाधारण जागांसाठीचे नव्हते, तर स्त्रियांसाठी ३३ टक्के अधिकारपदे (महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष, सरपंच, जिल्हा परिषद अध्यक्ष) राखीव ठेवण्यात आली.

या आरक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग ३३ टक्के वाढला. महिलांना राजकीय सत्तेमध्ये वाटा मिळाला, परंतु लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये हा महिलांचा सहभाग नव्हता. हा सहभाग भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये वाढविला आहे. महिला, अ.जाती व अ.जमाती यांना ५० टक्के आरक्षण देणारे धोरण आखले आहे.



Scanned with CamScanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

पंचायत व महानगरपालिका यांच्या पातळीवर लागू झालेले आरक्षण विधानसभा व लोकसभा या पातळीवरही लागू केले जावे, हा विचार यातून पुढे आला. मार्च २०१० रोजी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने लोकसभा व विधानसभा यामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक राज्यसभेत मांडले. त्या विधेयकाला राज्यसभेने मंजुरीदेखील दिलेली आहे. या पातळीवर महिला सबलीकरण प्रक्रिया राबविण्याचा विचार दिसतो.

❖ भाजपप्रणीत महिला धोरण :

भारत सरकारने २००१ मध्ये महिला सबलीकरण धोरण मांडले. या धोरणाची पार्श्वभूमी भाजपच्या सत्तेच्या कालखंडात सुरु झाली ; परंतु अंमलबजावणी संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारने महिला सबलीकरण धोरणाची राष्ट्रीय पातळीवर आखणी केली. सरकारने हे धोरण मांडताना महिलांच्या चळवळीतील अनेक मुद्दे स्वीकारले आहेत. मेक्सिको (१९७५), नैरोबी (१९८५) व बीजिंग (१९९५) या झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांतील सामाजिक दर्जा व लैंगिक समता यांचा झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांतील सामाजिक दर्जा व लैंगिक समता यांचा विचार या धोरणात स्वीकारलेला दिसतो. या धोरणाने महिलांची क्षमता वाढविण्याची व अधिकाराणे सत्ता देण्यासाठी उद्दिष्टे स्पष्ट केली आहेत. महिलांची कार्यक्षमता, योजना व कौशल्ये वाढविण्यासाठी सकारात्मक सामाजिक, आर्थिक वातावरण कायद्याने तयार केले जाणार आहे. कायद्यातील पळवाटांमुळे महिलांना न्याय मिळत नाही. त्याकरिता न्यायव्यवस्था कार्यक्षम केली जाईल. सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनामध्ये महिलांना समान सहभाग व निर्णयप्रक्रियेमध्ये समान संधी दिली पाहिजे, अशी भाजपप्रणीत सरकारची भूमिका होती.

महाराष्ट्र राज्यात हिंदू वारसा कायद्यात सुधारणा करुन महिलांना जन्मजात हक्क म्हणून मालमत्तेत पत्नीला सामाईक भागीदार बनविणे ; राजकीय, आर्थिक व प्रशासकीय क्षेत्रातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभाग शक्य व्हावा, म्हणून राखीव जागांची तरतूद व शेवटी या महिला धोरणामुळे शहरातील स्त्रियांना कौटुंबिक दर्जाच्या बाजूलापासून, लिंगभेदाच्या न्यूनगंडातून व पुरुषी परावलंबित्वातून बाहेर पडण्याची उमेद निर्माण झाली. असे असले, तरीसुद्धा ग्रामीण भागात स्त्री-प्रश्नावर काम करणाऱ्या किंवा शहरी कष्टकरी स्त्री-प्रश्नावर चळवळी करणाऱ्या स्त्री-कार्यकर्त्या या धोरणाच्या प्रक्रियेपासून लाभ घेताना दिसतात. गर्भित हेतूच्या व वास्तवाच्या एकूण मर्यादांमुळे या महिला संघटना व राज्याच्या सामाजिक धोरणाच्या लाभार्थी महिला गट हा सुशिक्षित, शहरी मध्यमवर्गीय स्त्री हाच बनतो.

महिला धोरणाद्वारे स्त्रियांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा व त्यांना समाधानी बनविण्याचा प्रयत्न राज्यसंस्था करताना दिसते. राज्याच्या प्रशासकीय, राजकीय व आर्थिक क्षेत्रात महिलांना स्थान, स्वातंत्र्य व राखीव जागांमध्ये स्त्रियांना राजकीय प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतले जाईल. नोकरीतील राखीव जागामुळे एका पातळीवर स्त्री-पुरुष प्रशासकीय सत्तासंबंधात लोकशाही आणू शकतील ; परंतु समता मात्र येणार नाही, असे भाजप सरकारचे धोरण होते. ही सरकारची धोरणे आहेत. पक्षांची धोरणे यापेक्षा वेगळी आहेत. सरकारच्या धोरणांमध्येही नोकरशाहीकरण केले आहे, असे दिसते.

सारांश :

भारतातील १९५० ते २०१० या दरम्यानच्या महिलाविषयक सार्वजनिक धोरणाचे तीन टप्प्यांमध्ये वर्गीकरण झालेले दिसते. एक- कल्याणकारी चौकटीत कायदे तयार करणे व आयोगांची नेमणूक करणे हा महिला धोरणाचा भाग होता. राज्यघटनेतील समतेचे तत्त्व मात्र धोरणात उतरले नाही. दोन-महिला संघटना, दबाव गट, राजकीय पक्ष, आंतरराष्ट्रीय वातावरण यांच्या प्रभावामुळे भारत सरकारने कल्याणकारी महिला धोरणाच्या जागी विकासलक्ष्यी महिला धोरण आणले. या प्रकारच्या धोरणाचा काळ १९७५ ते १९९० या दरम्यान होता. तीन- १९९० नंतर महिला सबलीकरण धोरण आखले गेले. हे धोरण काँग्रेस व भाजप यांनी पुढाकार घेऊन आखले. या दोन पक्षांच्या धोरणात फार फरक नव्हता. मात्र काँग्रेस-भाजपसह सर्वच पक्षातील ओबीसी, अनुसूचित जाती, जमाती आणि मुस्लिम कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी काँग्रेस व भाजप या प्रमुख दोन पक्षांच्या महिला धोरणाला विरोध करत पर्यायी धोरण सुचविले. ओबीसी, अनुसूचित जाती व मुस्लिम कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी सुचविलेले महिलाविषयक धोरण काँग्रेस व भाजप यांच्या धोरणापेक्षा वेगळे आहे. त्यामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्रात धोरणविषयक पर्यायांचा अभाव दिसतो. तसा अभाव महिलाविषयक धोरणाच्या संदर्भात दिसत नाही.

संदर्भ :

१. चव्हाण वैशाली, २००३ भाजपचे महिला धोरण, परिवर्तनाचा वाटसरु, १६ मे ते ३१ मे २००३, पृष्ठ क्रमांक २९ ते ३१.
२. भागवत विद्युत, २००४, 'स्त्री-प्रश्नां' ची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे
३. पाटील भारती, १९९९, स्त्रियांचा सत्तेतील सहभाग, सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा धागा, साधना, २ जानेवारी १९९९.

□□□



Scanned with CamScanner